MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue February 2019

Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA®

Special Issue – Vol. I



# VIMUKTA - NOMADIC CASTES – TRIBES & OTHER BACKSWORD CLASS: PRESENT CONDITIONS, DEVELOPMENT & CHALLENGES.

Guest Editor

Dr.R.D.Rathod
Dr.B.K.Shep
Dr.K.M.Bhange

Scanned with OKEN Scanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

Special Issue – Vol. I

# VIMUKTA - NOMADIC CASTES – TRIBES AND OTHER BACKSWORD CLASS: PRESENT CONDITIONS, DEVELOPMENT AND CHALLENGES.

**Guest Editor**

**Dr.R.D.Rathod**

**Dr.B.K.Shep**

**Dr.K.M.Bhange**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with OKEN Scanner

Date of Publication
16 Feb. 2019

Vidyawarta™
International Multilingual Research Journal

## Editorial Board & Advisory Committee

1) Dr. Vikas Sudam Padalkar (Japan)
2) M.Saleem, Sialkot (Pakistan)
3) Dr. Momin Mujtaba (Saudi Arebia)
4) N.Nagendrakumar (Sri Lanka)
5) Dr. Wankhede Umakant (Maharashtra)
6) Dr. Basantani Vinita (Pune)
7) Dr. Upadhya Bharat (Sangali)
8) Jubraj Khamari (Orissa)
9) Krupa Sophia Livingston (Tamilnadu)
10) Dr. Wagh Anand (Aurangabad)
11) Dr. Ambhore Shankar (Jalna)
12) Dr. Ashish Kumar (Delhi)
13) Prof.Surwade Yogesh (Satara)
14) Dr. Patil Deepak (Dhule)
15) Dr. Singh Rajeshkumar (Lucknow)
16) Dr. Ashlesha Mungi (Baramati)
17) Dr.Patwari Vidya (Jalna)
18) Dr. Maske Dayaram (Hingoli)
19 ) Dr.Padwal Promod (Waranasi)
20) Dr.Lokhande Nilendra (Mumbai)
21) Dr.Narendra Pathak (Lucknow)
22) Dr.Bhairulal Yadav (West Bangal)
23) Dr.M.M.Joshi, (Nainital)
24) Dr.Sushma Yadav (Delhi)
25) Dr.Seema Sharma (Indor)
26) Dr. Choudhari N.D. (Kada)
27) Dr. Yallawad Rajkumar (Parli v.)
28) Dr. Yerande V. L.(Nilanga)
29) Dr. Awasthi Sudarshan (Parli v.)
30) Dr. Prema Chopde (Nagpur)
31) Dr Watankar Jayshree
32) Dr. Saini Abhilasha,
33) Dr. Vidya Gulbhile (M.S.)
34) Dr. Kewat Ravindra (Chandrapur)
35) Dr. Pandey Piyush (Delhi)
36) Dr. Suresh Babu (Hydarabad)
37) Dr. Patel Brijesh (Gujrat)
38) Dr. Trivedi Sunil (Gujrat)
39) Dr. Sarda Priti (Hydarabad)
40) Dr. Nema Deepak (M.P.)
41) Dr. Shukla Neeraj (U.P.)
42) Dr. Namdev Madumati (M.P.)
43) Dr. Kachare S.V. (Parli-v)
44) Dr. Singh Komal (Lucknow)
45) Dr. Pawar Vijay (Mumbai)
46) Dr. Chaudhari Ramakant (Jalgaon)

Indexed

IMPACT 6.021 iijif FACTOR

Cosmos
IMPACT FACTOR
5.234

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

**Note :** The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Printing Area' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

विद्यावार्ता : http://www.printingarea.blogspot.com 6.021(IIJIF)

14) हरितक्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक यांचे शेतीविषयक विचार
प्रा.डॉ. डि. के. राठोड, जि. अकोला ||44

15) महाराष्ट्रातील विमुक्त – भटक्या जाती–जामती व मागासवर्गीयांच्या विकासात वसंतराव नाईक ...
डॉ. चांगदेव निवृत्ती मुंढे, जि. जालना ||47

16) महाराष्ट्रातील भटक्या–विमुक्त जाती–जमाती व इतर मागासवर्गीयांची सध्यस्थिती
प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड, कळंब ||49

17) महाराष्ट्राच्या विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान
प्रा.सोनटक्के रमेश शंकरराव, जि. बीड ||53

18) वसंतराव नाईक यांचे शेतकरी व मजुरासाठीचे योगदान.
प्रा. डॉ. उत्तम छाजू राठोड, जि.परभणी ||55

19) समाजकारणातील जाणता राजा : ना.वसंतरावजी नाईक
प्रा.विलास सोमाजी पवार, हिंगोली ||58

20) महाराष्ट्रातील विमुक्त भटक्या जाती - जमाती व इतर मागासवर्गीयांच्या विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान
प्रा. डॉ. फुलचंद भा. सलामपुरे & प्रा.डॉ. वाटोरे सुनिता माधवराव, जि. बीड ||61

21) वसंतराव नाईकांचे : कृषी विषयक कार्य
प्रा. पावडे खोब्राजी वामनराव, जि.उस्मानाबाद ||63

22) वसंतराव नाईक यांचे महाराष्ट्राच्या विकासात योगदान
प्रा. डॉ. पंजाबराव रामकृष्ण थारकर, जि. बीड ||65

23) वसंतराव नाईक : जीवन आणि कार्य
डॉ.आहिरे भास्कर मुरलीधर, पाटोदा ||67

24) हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक : जीवन आणि कार्य
प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास, जि. बीड ||69

25) वसंतराव नाईक यांचे सामाजिक कार्य व योजना (१९६७ - १९७५)
प्रा.अशोक रावसाहेब भोसले, जि.बीड ||72

26) आधुनिक महाराष्ट्राच्या विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान
प्रा.डॉ.युलिसिस एकनाथ भालेराव, जि.औरंगाबाद ||74

27) हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांचे जीवन व कार्य
प्रा.डॉ.विद्या खंडारे, हिंगोली ||77

28) महाराष्ट्राच्या विकासात वसंतरावजी नाईक यांचे योगदान
प्रा.डॉ.विजय अमरू चव्हाण, ता.जि.अकोला ||78

29) विमुक्त–भटक्या जाती–जमाती व इतर मागासवर्गीयांच्या सामाजिक विकासात वसंतराव नाईक यांचे...
डॉ. बी. आर. मस्के, अमरावती ||82

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with OKEN Scanner

लॉट्री सुरु केली.त्यामुळे राज्याच्या आर्थिक उत्पन्नात भभर पडली.

**सारांश:—**

वसंतराव नाईक हे २०व्या शतकातील असे नेतृत्व होते कि ज्यांच्या कार्य कर्तुत्वामुळे महाराष्ट्रघडला व त्यांनी इतिहास घडविला.ते एक लोकमान्य व्यक्तिमत्व होते.विदभर्भाचे भभाग्यविधाते तर ते होतेच.परंतु संपूर्ण महाराष्ट्राला त्यांनी आपल्या दृष्टत्र धोरणांनी व जबाबदारीने सुजलाम—सुफलाम बनविले.त्यांचे व्यक्तिमत्व अनेक पैलूंनी बनलेले होते.ते सर्वव्यापी व सर्व समावेशक बहुआयामी होते.

**संदर्भग्रंथ सूची:—**

१) डॉ. आगलावे प्रदीप २००७,—सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर प्रकाशन, नागपूर.

२) भांडारकर पू.ल., १९८७ —सामाजिक संशोधन पद्धती, विलास अंधारे प्रकाशन, महाराष्ट्र विद्यापिठ,ग्रंथनिर्मिती मंडळ,नागपूर.

३) वसंतराव नाईक स्मशती प्रतिष्ठान, पुसद स्मरणिका, १८ ऑगस्ट १९९४.

४) पाटील पंढरीनाथ —सामान्यातील असामान्य वसंतराव नाईक.

५) बैस रामबिहारीसिंग— वसंतराव नाईक यांचे जीवनचरित्र.

६) रुद्रवार उत्तम —महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतराव नाईक.

७) गाडे सोपान—महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक .

८) भोवळे भास्कर लक्ष्मण —आधुनिक भभारतातील राजकीय विचार.

९) राजे लता—कर्तबगार जीवनाची सावली वत्सलाबाई नाईक,प्रकाशन जाने २००२.

१०) शर्मिला अशोक साबळे —वसंतराव नाईक यांचे जीवन व कार्य (शोध प्रबंध)जून २००७.

□□□

**18**

# वसंतराव नाईक यांचे शेतकरी व मजुरासाठीचे योगदान

**प्रा. डॉ. उत्तम छाजू राठोड**
सहयोगी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक व इतिहास विभाग प्रमुख,
नुतन महाविद्यालय सेलू, जि.परभणी

**********

**प्रस्तावना:** - एका महान राजनीतिज्ञाने राजकारण हा बदमाषांचा खेळ आहे, अशी राजकारणांची व्याख्या केली आहे. ही व्याख्या अत्यंत समर्पक असल्याचे आता सर्वत्र मानले जाते. पण नियमाला जसे अपवाद असतात तसे या व्याख्येलाही काही अपवाद असणारच. अशा अपवादामध्ये महाराष्ट्राचे भूतपुर्व मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा समावेश करावा लागेल. माणूस व माणूसकी हा त्यांचा राजकारणाचा केंद्र बिंदू होता. त्यामुळेच एक सज्जन राजकारणी व्यक्ती म्हणून ते देशभर मान्यता पावले.

वसंतराव नाईक यांचा जन्म दि.१जुलै,१९१३ रोजी बंजारा समाजातील शेतकरी कुटूंबात यवतमाळ जिल्हयाच्या पुसद तालुक्यातील गहुली या गावी झाला. गावामध्ये शाळेची सोय नसल्यामुळे त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण जवळच्या गावी केले. तसेच यवतमाळ, अमरावती व नागपूर येथे माध्यमिक शिक्षण पूर्ण करुन १९३३ मध्ये ते मॅट्रीक ची परिक्षा उत्तीर्ण झाले. पुढे नागपूर विद्यापीठातून बी.ए. करुन १९४० मध्ये वकिलीची पदवी घेऊन त्यांनी पुसद येथे वकिलीच्या व्यवसायाला प्रारंभ केला. वकिली करत असतांना पुसदच्या सामाजिक, राजकिय व सार्वजनिक जीवनास त्यांनी सुरुवात केली होती.

समाज सुधारणेच्या चळवळीचा उद्देश राजकारणाशिवाय साधू शकत नाही, असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांनी राजकारणात प्रवेश केला. सन १९४६ ते १९५२ पर्यंत ते पुसद नगर परिषदेचे अध्यक्ष होते. १९५२ साली सर्वप्रथम पुसद मतदार संघातून आमदार म्हणून ते निवडून आले व मध्यप्रदेश सरकारच्या मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री १९५६ पर्यंत राहिले. नंतर यशवंतराव चव्हाण मंत्रिमंडळात मुंबई द्विभाषिक प्रांताचे ते १ नोव्हेंबर, १९५६ रोजी सहकारमंत्री झाले. पुढे १९५७ मध्ये निवडणुकीमध्ये निवडून येऊन त्यांनी ११ एप्रिल, १९५७ ला कृषीमंत्री पदाची शपथ घेतली. या पदावर ते एप्रिल,१९६० पर्यंत होते. या काळात मुंबई येथील आरे दुग्धव्यवसायाच्या विकासासाठी त्यांनी परदेशातून दर्जेदार आधुनिक यंत्रे आणि उत्तम प्रतीची जनावरे शासनातर्फे आणण्याची व्यवस्था केली. आरे ही दुग्धव्यवसायातील आशियातील उत्तम दर्जाची वसाहत आहे. याचे श्रेय वसंतराव नाईकांनाच आहे. तसेच सन १९५७ साली भारतीय कृषी संशोधन मंडळाच्या स्थाई समितीचे सदस्य म्हणून त्यांनी चीन, जपान, सिंगापूर आणि श्रीलंका आदी राष्ट्रांचा दौरा करुन तेथील शेतीविषयक माहिती मिळवून ती माहिती त्यांनी राज्यातील शेतक-यांना करुन दिली. स्वतंत्र मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर



Scanned with OKEN Scanner

ते १ मे, १९६० ते ४ डिसेंबर १९६३ पर्यंत महसूल मंत्री होते. त्याच काळात त्यांनी शेतजमिनीचा कमाल जमीन धारण कायदा करुन व्यक्तिगत जमिन धारणेबरोबरच खासगी साखर कारखानदाराच्या जमिनीला सदर कायदा लागू केला.[२]

भारतात पंचायत राज लागू करण्यासाठी बळवंतराव मेहता समिती स्थापन करुन पंचायत राज महाराष्ट्रात लागू करण्यासाठी ते महसूल मंत्री असतांना त्यांच्या अध्यक्षतेखाली १९६० मध्ये वसंतराव नाईक समिती स्थापन करण्यात आली. त्यांच्या शिफारसीवरुन महाराष्ट्रात पंचायत राज त्रिस्तरीय योजना लागू करण्यात आली. सत्तेचे विक्रेंदीकरण करुन ग्रामीण नेतृत्वाच्या विकासास चालना दिली. त्यांच्या शिफारसीमुळे इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्राचे पंचायतराज बळकट व सक्षम झाले.

उद्येशः - १. वसंतराव नाईकांनी शेती क्षेत्रामध्ये आणलेल्या बदलावर प्रकाश टाकणे.

२. वसंतराव नाईकांच्या शेतकरी व मजूरांच्या कामगीरीवर प्रकाश टाकणे.

३. वसंतराव नाईकांने शेतकरी व मजुरासाठीच्या केलेल्या योजनांचा आढावा घेणे.

**स्वरूप व व्याप्ती :-** प्रस्तुत शोध निबंधामध्ये वसंतराव नाईकांच्या मंत्री व मुख्यमंत्री पदाच्या काळात शेतकरी व मजुरांच्या संदर्भात केलेल्या कार्यांचा आढावा घेण्यात आला आहे. यासाठी फक्त महाराष्ट्रातील शेतकरी व शेतमजूरांच्या उत्कर्षासाठी अवलंबवीलेल्या योजनावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती :-** प्रस्तूत शोध निबंधासाठी ऐतीहासीक वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच या संशोधनासाठी दुय्यम साधनसामूग्रीचाही उपयोग करण्यात आला आहे.

कन्नमवार यांच्या अकस्मिक मृत्यूनंतर वसंतराव नाईक हे ५ डिसेंबर, १९६३ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. या पदावर ते १९ फेब्रुवारी १९७५ पर्यंत म्हणजे जवळपास ११ वर्षं ३ महिने होते. मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर आकाशवाणीवरुन भाषण करताना त्यांनी शेतकरी हा कारखानदार झाला पाहिजे. असे प्रतिपादन केले होते. मंत्री व मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीत त्यांनी १९५६ व १९७१ ची दोन युध्दे व तीन अवर्षणांना तोंड दिले. वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाले तो काळ देशातील शेती आघाडीवरील अरिष्टांचा होता. देशाला अमेरिकेकडून धान्य आयात करावे लागत होते. त्यासाठी परकीय चलन मोठया प्रमाणावर खर्च होत होते. महाराष्ट्र हे नावाप्रमाणे भारतातील मोठे राज्य पण अन्नधान्याच्या दृष्टीने महाराष्ट्राचा क्रमांक खालीच, गरजेपेक्षा धान्य कमीच पिकत होते.

वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राच्या शेतीमधून भरपूर उत्पन्न काढण्याचा निर्धार केला. त्याप्रमाणे पुण्याच्या शनिवारवाडयाच्या जाहिर सभेत त्यांनी हा निर्धार बोलून दाखविला ते म्हणाले होते, दोन वर्षात महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले नाही तर मला फाशी द्या!. यावरुन त्यांची शेतीविषयीची तळमळ, जिद्द आणि दृढनिष्ठा दिसून येते आणि त्यांनी तसे करुन दाखविले. त्यासाठी त्यांनी संकरित वाणांच्या वापरावर भर दिला. सोबतच किटकनाशके व रासायनिक खताचा वापर करण्यास त्यांनी शेतक-यांना प्रवृत्त केले. दुष्काळी परिस्थितीतही सर्व मार्गाचा अवलंब करुन अधिकाधिक उत्पन्न कसे काढता येईल याकडे त्यांनी जातीने लक्ष दिले. पारंपारिक पध्दतीने शेती करणा-यांना समजावून सांगितले. शेतक -यांनी संकरित ज्वारी व कापुसाची लागवड करावी, यासाठी त्यांनी स्वतः महाराष्ट्रभर फिरुन शेतकऱ्यांना पटवून दिले. शेती खात्यात अमूलाग्र बदल घडवून आणून कृषी क्षेत्रात एक क्रांतीच घडवून आणली.[४] संकरित पिकाची मुहूर्तमेढ रोवून वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रात हरितक्रांतीचे पर्व सुरु केले. वसंतराव नाईक हे हाडाचे शेतकरी होते. १९४० पासून ते स्वतः शेती करत. त्यामुळेच शेतक-यांविषयी त्यांच्या मनात अत्यंत आदर होता. त्यामुळे महाराष्ट्राच्या कृषी विद्यापीठांना योजना आखताना व त्या यशस्वी करतांना त्याचा अनुभव व ज्ञान अत्यंत उपयुक्त ठरले. महाराष्ट्रात जी कृषी-आद्यौगिक क्षेत्रात प्रगती झाली, त्यामध्ये वसंतराव नाईकांचा सिंहाचा वाटा आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. विशेष म्हणजे त्यांच्या मागे मुख्यमंत्रीपदाचा व कामाचा व्याप असतांनाही त्यांनी स्वतःच्या शेतीकडे तसेच शेतक-यांकडे दुर्लक्ष केले नाही उलट नव-नवीन प्रयोग करण्याच्या हव्यासापोटी त्यांनी पुसदला आपल्या शेतीवर द्राक्ष बागेचाही प्रयोग केला.

वसंतराव नाईकांनी कापसाला हमी भाव मिळावा म्हणुन १ ऑगष्ट, १९७२ ला कापूस एकाधिकार योजना सुरु केली. रोजगार हमी योजना वसंतराव नाईकांच्याच काळात सुरु झाली. या दोन्ही योजना सुरु करणारे वसंतराव नाईक हे पहिले मुख्यमंत्री व महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे, हे विशेष.

ओलिताच्या पाण्याविषयी फार वाद विवाद न करता नदी-नाल्यामध्ये पाणी आडवा व जमिन भिजवा ते न जमल्यास घागरीने पाणी आणून जमिन ओली करा, असे ते म्हणत तसेच छोट्या नदी-नाल्यावर लहान बंधारे बांधण्याच्या कल्पनेचा त्यांनी पुरस्कार केला. हेच ते बधांरे नंतर वसंत बधांरे म्हणुन लोकप्रीय झाली. त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी आडवा पाणी मुरवा हि नविन दृष्टी लाभली. आमची मुले पोषाखी बनुन शेती व खेडयापासुन दुर जाऊ लागली तर तो शिक्षणाचा पराभव आहे, असे ते नेहमी म्हणत.

अधुनिक पध्दतीने शेती, खते, सिंचान, ट्रॅक्टर व यंत्राचा तसेच विज वगैरे सगळ्यांचा उपयोग करुन शेती केल्यास तिच आपणास श्रीमंत बनविते. तसेच शेती सोबतच जंगल विकास, कुकुटपालन, पशुपालन, मधमाशिपालन आदी व्यवसायाची सांगड शेती व्यवसायाशी घातल्यास शेतक-याच्या उत्पादनात वाढ होऊन ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था सुधारण्यास फार मोठी मदत होइल, आसे त्यांना वाटत. गीरण्या, भाजीपाला आणि फळांवरील प्रक्रिया, तेलखाद्य, कापसाचे जिनिंग व प्रेसिंग, दुधाचे पदार्थ, डाळ उद्योग, पशुखाद्य, यासारखे उद्योग तर पुर्णता शेतीवर अवंलबुन आहेत. शेतीसंबंधी उद्योग हे ग्रामीण भागातच निघाले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. शेती ही शेतक-यांची समस्या न मानता ती देशची समस्या आहे, हे मानले पाहिजे.[३]

शेती संबंधी मालकीची भावना बाळगुन कोणतेच हित होणार नाही. ती भावना आता मागे पडली पाहिजे. उत्पादन वाढवीण्याचा शेती हा पवित्र धंदा आहे. तसेच शेतमजूर हा प्रतिष्ठीत माणूस आहे असे समजण्यात आले पाहिजे.



Scanned with OKEN Scanner

कारखानदाराने शेतक-याकडे पिळवणूकीच्या भावनेने पाहणे म्हणजे आपण ज्या फांदीवर बसलो आहेत ती फांदीच बुंध्यापासून तोडून टाकण्यासारखे आहे. गरीबी कायद्याने किंवा कुणाच्याही दानाने दूर होणार नाही; तर ती आपल्याजवळील साधनांचा चार्तुयाने उपयोग करुन वाढविण्यानेच दूर होईल व त्यामुळेच देश समृध्द होईल. असे वसंतराव नाईकांचे मत होते.

वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीने व त्यांनी केलेल्या कार्यामुळेच महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊन मोठा निर्यातदारही बनला आहे. महाराष्ट्रातील साखर, कडधान्य, फळे, फुले, दुध व कापूस देशातच नव्हे तर परदेशातही निर्यात होत आहे. त्यांच्याच प्रेरणेने शेतीचे उत्पन्न वाढले व हरितक्रांती घडून आली. त्यांच्या कार्याच्या स्मरणार्थ कृषी क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणा-यांना शासनातर्फे प्रत्येकवर्षी वसंतराव नाईक यांच्या नावे वेगवेगळे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

वसंतराव नाईक यांनी ५ डिसेंबर, १९६३ ते १९ फेब्रुवारी, १९७५ या काळात म्हणजेच जवळ जवळ १२ वर्ष महाराष्ट्राचे नेतृत्व केले. सलगपणे स्थिर सरकार कशा प्रकारे देऊ शकतो याचा आदर्शच त्यांनी घालून दिला. या नेत्याने मुंबईसह सा-या महाराष्ट्राची औद्योगिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रगती करण्यात महत्वाचा वाटा उचलला. महाराष्ट्राचा एक लोकप्रिय मुख्यमंत्री असा लौकिक मिळवला. [४]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्र भूमीची मुख्यमंत्री म्हणून एवढी दीर्घकाळ सेवा करण्याची संधी केवळ वसंतराव नाईक यांनाच मिळाली. आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या मोठया काळात त्यांनी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेऊन राज्याचा विकास केला. त्यांनी शेती व शेतक-यांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले.

वसंतराव नाईक यांना शेती व शेतकरी यांच्याबद्दल अत्यंत जिव्हाळा व प्रेम होता. महाराष्ट्रातील सामान्य शेतकरी आर्थिक दृष्टया संपन्न व्हावा असे त्यांना वाटत होते. त्यासाठी शेतकऱ्यांच्या व मजुरांच्या प्रश्नांना त्यांनी अधिक प्राधान्य दिले होते असे आपणास त्यांच्या पूढील कार्यावरून दिसून येते.

१. राज्यपुर्नरचनेच्या अगोदर ज्या भागात दुष्काळ पडला होता. त्या भागात सडकाचे काम अपुर्ण राहीले होते अपूर्ण राहिलेल्या सडक बांधण्याचे काम त्यांनी पुर्ण केले.

२. नवीन विहिरी खोदून जास्त जमीन ओलीताखाली आणण्याबद्दल शेतक-यांना उत्तेजन दिले. पम्पिंग सेटस् विकत घेण्याकरिता तकावी देण्याची योजना अंमलात आणली.

३. ज्या गावात वीज आहे. त्या गावात तेथील शेतक-यांना विजेवर चालणारे पंप तकावीवर मिळतील अशी व्यवस्था केली.

४. जास्त जमीन ओलीताखाली आणण्याकरिता त्यांच्या कारकीर्दीत पुष्कळ नवीन तलाव दुरुस्त करण्यात आले.

५. ग्रामदानात मिळालेल्या ब-याच खेड्यातील शेतक-यांना त्यांनी सरकारकडू भरीव अशी आर्थिक मदत दिली. महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यात ग्रामदानात मिळालेल्या १५७ खेड्याना २ लक्ष रुपये मुंबई सरकारकडून त्यांनी मंजूर करुन घेतले.

६. वसंतराव नाईकांनी मोठया बहुउद्देशिय सहकारी संस्थेचे महत्व लोकांना पटवून देउन विविध कार्यकारी सहकारी संस्था स्वयंसिध्द असतात याची कल्पना सर्व शेतक-यांना करुन दिली. त्यावेळी त्यांनी लावलेल्या अंकुराला आज भरगच्च फळे आलेली दिसत आहेत.[५]

७. शेतक-यांच्या हिताकरिता विविध कार्यकारी संस्थांनी आपआपल्या ठिकाणी गोदाम बांधावे म्हणून त्यांनी उत्तेजन दिले. विविध कार्यकारी संस्थांचे गोदाम प्रत्येक ठिकाणी झाल्यामुळे शेतकरी आपला शेतमाल गोदामात माफक व्याजाच्या दराने ठेऊ लागला व बाजारात त्यांच्या शेतमालाला भाव आल्या बरोबर विकू लागला. या योजनेमूळे सर्व शेतकरी आनंदात जीवन जगू लागले. यावेळी बांधण्यात आलेले गोदाम, गोदाम राहीले नसुन शेतकऱ्याकरिता समृध्दि मंदिर बनले आहेत.

८. शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव येण्याकरीता सहकार तत्वावर जिनींग व प्रेसींग कारखाना उघडण्याच्या बाबतीत त्यांनी प्रेरणा दिली.

९. वसंतराव नाईकांनी दूध पुरवठा करणा-या सहकारी संस्थांना भरीव अशी आर्थिक मदत मिळण्याबाबत स्थायी स्वरुपाची योजना केली. ही योजना त्यावेळी कार्यान्वित केल्यामूळे आज मोठमोठ्या शहरात अशा दुग्ध कॉलनी सूरु झालेल्या दिसत आहेत.

१०. वसंतराव नाईकांनी आधूनिक साधने, व अवजारे शेतक-यांनी आपल्या शेतात वापरावीत म्हणून उत्तेजन दिले. शेती नांगरण्याकरीता ट्रॅक्टर्स सरकारकडून भाड्याने मिळू शकतील अशी व्यवस्था केली.

११. मुंबई राज्याच्या व्दितीय पंचवार्षीक योजनेत विदर्भाकरिता ३९ कोटी २० लक्ष रुपयांची त्यांनी अलग तरतूद केली. विदर्भाची उन्नती ही महाराष्ट्रातच राहून होणार आहे, हे बोलत असतांना विदर्भाकरिता करण्यात आलेली तरतूद ते लोकासमोर ठेवीत असत. [६]

१२. वसंतराव नाईकांनी बांध बदिस्ती योजना महाराष्ट्रात लागू केली. बांध बंदिस्तीची योजना आणि तिची शास्त्रीय पध्दती अगदीच अपरिचित होती. या योजनेमूळे शेतक-यांचा फार मोठा फायदा झाला आहे. जमिनीतील खत, माती वाहून जाऊ नये, तिची धुप, कस जाऊ नये म्हणून या योजनेचा शेतक-यांना फार फायदा झाला व आजही होत आहे.

१३. वसंतराव नाईकांनी सहकारी शेतीचा पुरस्कार केला. संयुक्त सहकारी शेतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी सेवा सहकारी सोसायटया प्रस्थापित करण्याची योजनाही सहकारी शेतीच्या ठरावात होती, म्हणून त्यांनी सहकारी शेतीचा हिरीरीने पुरस्कार केला.

१४. जपानच्या आंतरराष्ट्रीय भात मंडळावर भारताचे प्रतिनिधी म्हणून वसंतराव नाईकांचे नाव अंतर्भुत करण्यात आले होते. यात त्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचा आपल्या महाराष्ट्राला फारच फायदा होत आहे.[७]

१५. भारतीय कृषिसंशोधन परिषदाच्या अर्थ व स्थायी समितीवर नाईकांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली होती. यात राहून त्यांनी मौलिक कामगिरी केली.

वसंतराव नाईकांच्या विचारामुळे खेड्या पाड्यातील सहकारी चळवळ, औद्योगिक विकास, विद्युत शक्तिही खेड्या पाड्यात पोहचली आहे त्यामुळे ग्रामीण जिवनातील लोकशही उभी झाली आहे. वसंतराव नाईक यांचे तत्कालीन विचार व योजना आपणास सद्य परिस्थीतीही फलदायी स्वरुपाचे ठरणारे आहेत आणी हे कटुसत्य कोणीही नाकारू



Scanned with OKEN Scanner

शकणार नाही असे मला वाटते.

**निष्कर्ष:-** १. वसंतराव नाईकांनी शेती क्षेत्रामध्ये प्रचंड प्रमाणात अमुलाग्र बदल घडून आणले आहेत.

२. वसंतराव नाईकांनी शेतकऱ्यांना व मजूरांना कारखानदारापेक्षाही जास्त महत्व दिलेले आहे.

३. वसंतराव नाईकांनी शेतकऱ्यांच्या मालाला बाजारामध्ये हमीभाव दिला.

४. वसंतराव नाईकांनी शेतकऱ्यांना संकरीत वाण लागवडीसाठी व किटकनाशके आणी रासायनीक खते वापरण्यासाठी प्रवृत्त केले.

५. वसंतराव नाईकांनी शेती क्षेत्रामध्ये यांत्रीकीकरण आणून शेती क्षेत्रात एक क्रांतीच घडवून आणली.

६. वसंतराव नाईकांनी कृषी-औद्योगीक क्षेत्रात प्रगती करून शेतकरी व मजूरांची आर्थिक दूरावस्था दूर केली.

७. वसंतराव नाईकांनी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवीले.

८. वसंतराव नाईकांनी महाराष्ट्रात हरीतक्रांतीचे पर्व सुरू केले.

**संदर्भ - सूची**

१) प्राचार्य राजाराम राठोड हिरवी क्षितीजे (संपादक/प्रकाशक) कल्पना मुद्रनालय, पुणे. ३०.१९७१.पृ.७

२) प्रा. डॉ. उत्तम रुद्रवार, महाराष्ट्राचे वसंत वैभव प्रा. पुंडलीक धुमाळ (संपादक) प्रकाशक डॉ. एन.पी.हिराणी, पुसद जि. यवतमाळ. १८ ऑगस्ट, १९९२. पृ.१२.

३) मधु मंगेश कर्णीक दुत पर्जण्याचा - मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांचे चरित्र प्रकाशक नरेंद्र तिडके, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई. १९७८पृ.९३.

४) पंढरीनाथ पाटील सामान्यातील असामान्य - वसंतराव नाईक प्रकाशन - सौ. पाटील, सरकारी वसाहत. बांद्रा, पूर्व मुंबई. १९७५. पृ. ४३.

५) रामविहारी सिंग बैस वसंतराव नाईक चरित्र अभिजित प्रकाशन, नागपूर. १९७३. पृ. १९.

६) प्रा. चंद्रकांत नारायणराव कलकोटे वसंतराव नाईक यांचे सामाजिक व राजकीय कार्य, यवतमाळ. १९७८. पृ. ७९.

७) Dinesh Desai The Plough and the Pipe Parijat Prakashan, Mumbai. 1972. P. 49.

□□□

**19**

# समाजकारणातील जाणता राजा : ना.वसंतरावजी नाईक

**प्रा.विलास सोमाजी पवार**
समाजशास्त्र विभाग,
आदर्श महाविद्यालय हिंगोली

***********

**प्रस्तावना -**

समाजकारणातील जाणता राजा : वसंतरावजी नाईक साहेब यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी पुसद तालुक्यातील गहुली तांडयात माता हुनकाबाई व पीता फुलसींग राठोड या दाम्पत्याच्या पोटी झाला. ५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५ या कालावधीत वसंतराव नाईक साहेब ११ वर्षापेक्षा अधिक काळ महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर विराजमान होते. तत्कालीन समाज, लोकजिवन, कृषीसंस्कृती, राजकारण, अर्थ व धर्म कारण, स्त्रि जिवन, दारिद्रय, अस्पृष्यता, देशनिष्ठता, शिक्षण इत्यादी विषयावर त्यांनी वेळोवेळी व निरनिराळया प्रसंगी स्पष्ट, प्रखड व प्रांजळपणे मते मांडली आहेत. महाराष्ट्रातील राजकारण, अर्थाकारण, कृषीक्षेत्र यासाठी त्यांची मोठी देणगी राहीली आहे. राजकारणापेक्षा समाजकार्याला त्यांनी प्राधान्य दिले. विशेषतः विमुक्त जाती-भटक्या जमातींच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांचे योगदान अद्वितीय राहीले आहे. संपूर्ण महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेच्या अडचणी व समस्या बारकाईने जाणून घेऊन त्यावर उपाय करण्यासाठी प्रयत्न केले. सर्वसामान्य लोकांशी स्वतः संपर्क साधून अगदी सुलभ रितीने लोकांचे सर्वांगीण हित आणि प्रगतीचे विचार त्यांनी वेळोवेळी मांडले. तत्कालीन समाजाला सामाजिक, सांस्कृतीक, आर्थिक आणि राजकीय समस्यांनी ग्रासून टाकले होते हे अंधार दुर करण्यासाठी एका मागास असलेल्या समुदायातील गोर बंजारा जमातीत हाजुसिंग राठोड म्हणजेच वसंतराव नाईक नावाच्या वादळाचा जन्म झाला. वसंतराव नाईक यांना ग्रामीण जनतेची नाळ माहिती होती. सामान्य लोकांना कळेल, समजेल, उमजेल अशा सोप्या शैलीत ते जनतेशी संवाद साधत असत. समाजकारण, अर्थकारण, लोकांची स्थिती, शिक्षण आणि कृषीसंस्कृती हे त्यांच्या जिव्हाळयाचे विषय होते. म्हणून त्यांच्या विचारात कोठेही संदिग्धता,बडेजावपणा व अनाठायी फुलोरा दिसून येत नाही.

५ डिसेंबर १९६३ रोजी मा. वसंतरावजी नाईक साहेब यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाची पहिल्यांदा शपथ घेतली. पुढे सलग तीन वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद भुषविण्याचा गौरव प्राप्त केला आणि म्हणूनच ज्या गौर बंजारा समाजातून मा. वसंतराव नाईक साहे आले त्या समाजाने ५ डिसेंबर हा गौर बंजारा समाज गौरव दिन पावन भुमी पुसद तालुक्यातील गहुली येथे लाखोंच्या उपस्थितीत संपन्न करण्यात आले. हि संपूर्ण महाराष्ट्रासाठी गौरवास्पद घटना आहे. बंजारा समाजाचे महानायक, गोरूरो उध्दारक, कृषीप्रधान राजा, हरीतक्रांतीरो प्रणेता, गहुली निवासी वसंतराव नाईक की जय असे बंजारा समाज बांधव म्हणतात. मा.वसंतराव नाईक यांनी खऱ्या अर्थाने महाराष्ट्राला सुजलाम, सुफलाम बनविले. हरीतक्रांतीचे प्रणेते म्हणून वसंतराव नाईक



Scanned with OKEN Scanner